# जाहिरात
## लिपिक - टंकलेखक परीक्षा - २००९

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालनालयाच्या** अधिपत्याखाली असलेल्या विविध संस्थांमधील राज्यस्तरीय लिपिक - टंकलेखक या गट-क संवर्गातील रिक्त पदावरील सरळसेवा भरतीकरीता **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे (एम.के.सी.एल)** यांचेमार्फत **लिपिक - टंकलेखक परीक्षा - २००९** ही **दि. १ मार्च २००९** रोजी घेण्यात येईल. प्रस्तुत परीक्षा महाराष्ट्रातील विविध केंद्रावर घेण्यात येईल.

विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे (एम.के.सी.एल) यांच्या राज्यातील विविध अधिकृत केंद्रांवर उपलब्ध होतील आणि पूर्ण भरलेले अर्ज स्विकारले जातील. सदर केंद्रांचे पत्ते व संपर्क क्रमांक http://oasis.mkcl.org/dmer या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. विहित नमुन्यातील अधिकृत केंद्रामार्फत प्राप्त केलेले अर्जच विचारात घेण्यात येतील. अन्य मार्गाने प्राप्त केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उमेदवाराने ज्या अधिकृत केंद्रावर अर्ज सादर केला असेल त्याच केंद्रावर स्पर्धात्मक परीक्षेकरीता प्रवेश पत्र खाली क्र.१७ मध्ये नमूद केलेल्या तारखांना प्राप्त होईल.

**२. पदांचा तपशील** :- प्रस्तुत परीक्षेच्या निकालाच्या आधारे भरावयाच्या पदांचा तपशील सोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये पहावा.

**३. वेतनश्रेणी :-** रुपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० अधिक नियमानुसार देय भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१. वयोमर्यादा - (दि.२७.०१.२००९ रोजी गणली जाईल)**

**४.१.१** उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे असावे.

**४.१.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ३८ वर्षापर्यंत.

(दोन) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत.

(तीन) माजी सैनिकांच्या बाबतीत प्रचलीत नियमानुसार

(चार) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ३८ वर्षापर्यंत

**४.२ अर्हता :- (दि.२७.०१.२००९ रोजी पूर्ण केली असली पाहिजे)**

**४.२.१** एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा महाराष्ट्रातुन उत्तीर्ण असला पाहिजे.

**४.२.२ लिपिक-टंकलेखक पदासाठी** - मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ३० शब्द या गतीची व इंग्रजी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ४० शब्द या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

**४.२.३** उपरोक्त अर्हता स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालानंतर उमेदवारांना त्यांची मूळ प्रमाणपत्र

पडताळणीसाठी जेव्हा बोलाविण्यात येईल त्यावेळी मूळ प्रमाणपत्रावरुन पात्र/अपात्र ठरविण्यात येईल.

४.२.४ **संगणक अर्हता** - महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, मंत्रालय, मुंबई दि.१९ मार्च २००३ अनुसार संगणक अर्हता (एम.एस.सी.आय.टी) नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाचे आत धारण करणे आवश्यक राहील.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. दिनांक २४ जून २००४ अन्वये शारीरीक पात्रतेचे निकष विहित करण्यात आले असून, अल्पदृष्टी (Partilly sighted ), अंशतः कर्णबधीर (Partially Deaf ) आणि अस्थिव्यंग (एका पायाने अधू/दोन्ही पायांनी अधू) असलेले उमेदवारच नियुक्तीसाठी पात्र आहेत. याबाबत संचालनालयाने नियुक्त केलेल्या विशेष वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

**५. शुल्क :-**

**५.१** अमागास- रुपये ४००/- **५.२** मागासवर्गीय- रुपये २००/-

**५.३** माजी सैनिक - शुल्क भरण्याची अट लागु नाही.

**६. परीक्षेचे स्वरुप :**

**लिपिक - टंकलेखक पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी) आहे. अशा लिपिकवर्गीय पदांकरीता लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील शालांत परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या प्रत्येक विषयांवर ५० गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदर लेखी परीक्षा इंग्रजी परीक्षा वगळता अन्य विषयांची परीक्षा मराठी भाषेतुन घेण्यात येईल.**

**७.** गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या (२०० पैकी) किमान ९० गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. तथापि मागासवर्गीयांकरीता ८० गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल.

**८.** परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल :

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर

२) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर

३) शारीरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

४) माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल)
**वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.**

**९. स्पर्धा परीक्षा ही महाराष्ट्रातील खालील केंद्रांवर घेण्यात येईल. अर्जदाराला त्याच्या पसंतीचे खालीलपैकी एक परीक्षा केंद्र निवडता येईल.**

**१) मुंबई २) रत्नागिरी ३) पुणे ४) कोल्हापूर ५) औरंगाबाद**

**६) अकोला ७) नागपूर ८) नाशिक ९) परभणी**

**१०. अर्जदाराने अर्जासोबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जोडु नयेत.**

अर्जदाराने स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालानंतर त्यांना मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल त्यावेळी खालील कागदपत्रांच्या (लागु असलेल्या) मूळ प्रती व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

(१) एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.
(२) एस.एस.सी. अथवा तत्सम परीक्षेची गुणपत्रीका.
(३) शाळा सोडल्याचा दाखला.

(४) मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिका-याचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र.

(५) विजा (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव प्रवर्गातील उमेदवारांसाठी दि. ३१.३.२००८ नंतर कार्यालयाने वितरीत केलेले सक्षम अधिका-याचे नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र.

(६) अपंग प्रवर्गातील उमेदवाराने अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती. तथापि, याबाबत संचालनालयाने नियुक्त केलेल्या विशेष वैद्यकीय मंडळाच्या तपासणीचा वैद्यकीय अहवाल अंतिम समजला जाईल. सोबत लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. अल्पदृष्टी (अपंग) प्रवर्गातील उमेदवारास परीक्षेसाठी लेखनिक अनुज्ञेय राहील. लेखनिकाची व्यवस्था उमेदवाराने करावी. लेखनिक हा इयत्ता ९ वी उत्तीर्ण पेक्षा जास्त अर्हताधारक असु नये.

(७) माजी सैनिकांसाठी/अपंग माजी सैनिकांसाठी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डाचा दाखला.

(८) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : रक्रीधो-२००२/प्रक्र-६८/क्रीयुसे-२, दि.३०.४.२००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडु प्रमाणपत्र सोबतच्या **परिशिष्ट-३ (ए)** मधील विहित नमुन्यातील राष्ट्रीय व राज्य स्तरावरील खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे असावे.

(९) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/म.से.आ. २०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दि.३१.३.२००८ नंतरचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/(२०००)/१२ दि. २८.३.२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.१ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या **परिशिष्ट "ब"** मधील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(११) विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमूद करावा. मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

(१२) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.

(१३) शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र (सोबत **परिशिष्ट "क"** पहावे)

## ११. पात्रतेनंतरच्या अटी व शर्ती :

**११.१** नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दि.१ नोव्हेंबर २००५ अनुसार लागु करण्यात आलेले अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

**११.२** निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**११.३** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना या संचालनालयाच्या अधिपत्याखालील कोणत्याही संस्थेत नियुक्ती देण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या व मागासवर्गीय उमेदवार जात पडताळणी प्रमाणपत्र धारक उमेदवारांना त्यांचे नियुक्ती आदेशाचे दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत आदेशित कार्यालयातील पदावर रुजु व्हावे लागेल. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल व ते पुढे नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवडसूचीतील प्रतिक्षायादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन रुजु होणे अनिवार्य आहे.

**११.४** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रुजु झाल्यानंतर विहित केलेली विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**११.५** लिपिक - टंकलेखक या पदावर नेमणूक झालेले कर्मचारी हे महाराष्ट्रामध्ये कुठेही बदलीस पात्र राहतील.

**११.६** मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.

**१२.** रिक्त पद भरती प्रक्रियेबाबतचा सर्वसाधारण कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| **१) अर्ज विक्री आणि स्विकृतीचा कालावधी** | **: दि.२९.१२.२००८ ते २७.१.२००९** |
| **२) अर्ज स्विकृतीचा शेवटचा दिनांक** | **: दि.२७.१.२००९** |
| **३) लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र वितरण (एम.के.सी.एल.च्या अधिकृत केंद्रांवर)** | **: दि.१६.२.२००९ ते २१.२.२००९** |
| **४) लेखी परीक्षेचा दिनांक** | **: दि.१.३.२००९** |

वरील कार्यक्रमात बदल झाल्यास तो वृत्तपत्रात तसेच उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. सदर जाहिरात संचालनालयाच्या www.dmer.org व एम.के.सी.एल च्या http://oasis.mkcl.org/dmer या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.**

**सोबत परिशिष्ट जोडलेले आहे.**

**परिशिष्ट–अ – उपलब्ध रिक्त जागांचा संस्थानिहाय व प्रवर्गनिहाय तक्ता**
**परिशिष्ट–ब – लहान कुटंब प्रतिज्ञापन**
**परिशिष्ट–क – शारीरीक दृष्टया पात्र प्रमाणपत्र**
**परिशिष्ट ३ (ए)– राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळाचे प्रमाणपत्र**

# परिशिष्ट "अ"

## लिपिक – टंकलेखक, गट-क या संवर्गातील राज्यस्तरीय रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे :
## एकुण रिक्त पदे – २६४

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण / संस्था | अराखीव | अ.जाती | अ.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालनालय वै. शि.व सं.मुंबई | ७ (खे-१ म-१ मासै-२ कब-१) | १ म | १ (मासै) | १ | १ | १ | १ म | – | ३ (म-१) |
| २ | ग्रॅ.वै.म.मुंबई | ११ (म-२ मासै-३ अव्यंग-१) | ३ (म-१ मासै-१ | २ (खे-१) | १ म | १ | १ म | १ | – | ३ (म-१ मासै-१) |
| ३ | सर ज.जी.स. रुग्णालये,मुंबई | १३ (म-२ मासै-३) | ४ (खे-१ म-१ मासै-१) | ३ (म-१ मासै-१) | १ | १ (मासै) | १ | १ म | १ म | ४ म-१ |
| ४ | अधिसेविका कार्यालय, सर ज.जी.स.रुमुं | १ (मासै) | – | – | – | १ म | – | – | – | – |
| ५ | सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई | २ खे-१ | २ (मासै-१ अदृष्टी-१) | – | १ म | – | – | १ (मासै) | – | – |
| ६ | का.व आ. रुग्णालय, मुंबई | ३ (खे-१ म-१ मासै-१ | १ | १ म-१) | – | – | – | १ | – | २ (मासै-१) |
| ७ | गो.ते. रुग्णालय,मुं. | २ (खे-१ म-१) | १ म-१ | – | १ (मासै ) | – | – | – | – | ३ (मासै-१) |
| ८ | शा.दंत म.व रु.मुंबई | ४ म-१ मासै-१ अव्यंग-१ | १ | १ म-१ | – | – | – | – | – | ३ खे-१ मासै-१ |
| ९ | नागरी स्वास्थ केंद्र बांद्रा | १ म | १ | – | – | – | – | – | – | – |
| १० | आरोग्य पथक पालघर | – | – | १ | – | – | – | – | – | – |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे | ३ (मासै-२ खेळाडू-१) | – | – | १ | १ | – | – | – | ३ (मासै-१ खेळाडू-१) |
| १२ | अ.वि.रु.पुणे | १ | १ | – | – | – | – | – | – | – |
| १३ | बै.जी.वै.म.पुणे | १८ (महिला-५ मासै-३ खेळाडू-१) | ३ (महिला-१) | – | – | १ | – | १ | १ | ८ (महिला-२ मासै-२ खेळाडू-१ |
| १४ | शा.वै.म.नागपूर | १ | – | १ (मुब/कब) | – | – | – | – | १ (अल्प दृष्टी) | – |
| १५ | शा.वै.म.व रु. नागपूर | – | – | २ (मासै) | – | – | – | – | – | – |
| १६ | इं.गां.वै.म. नागपूर | ६ अस्थीव्यं-१ मुबधिर-१ अदृष्टी-१ | – | – | १ | – | – | – | – | – |
| १७ | इं.गां.वै.म.रु. नागपूर | ६ | १ | – | – | – | १ | – | १ | १ |
| १८ | अ.वि.रु. नागपूर | ३ | – | – | – | १ | – | – | – | – |
| १९ | आरोग्य पथक सावनेर | १ | – | – | – | – | – | – | – | – |
| २० | डॉ.बा.आं.रु.व अ.के. | १ | १ | – | – | – | – | – | – | – |
| २१ | शा.वै.म.रु. औरंगाबाद | १ (मासै) | – | १ (महिला) | – | – | – | – | – | १ (खेळाडू) |
| २२ | शा.दं.म.व रु. औरंगाबाद | २ | – | – | – | – | – | – | – | १ (मासै) |
| २३ | आ.प्र.पथक पैठण | – | १ | १ | – | – | – | – | – | – |
| २४ | डॉ.वै.स्मृ.शा.वै.म.सोलापूर | २ (महिला-१ मासै-१) | २ | – | – | १ | १ | – | १ | – |
| २५ | श्री छ.शि.म.स.रु.सोलापूर | ४ (अल्पदृष्टी-१ अस्थिव्यंग-१ महिला-१) | २ | – | – | – | १ | – | १ | – |
| २६ | प.वसंतदादा पाटील स.रु. सांगली | ४ (महिला-१ खेळाडू-१(म) | – | – | – | – | – | – | १ (मासै) | २ (महिला-१ मासै-१) |
| २७ | शा.वै.म.मिरज | ५ (महिला-२ अपंग-१) | २ (महिला) | १ (मासै) | १ (महिला) | १ (मासै) | – | – | – | २ (मासै-१ खेळाडू-१) |
| २८ | शा.वै.म.व रु. मिरज | – | १ (मासै) | – | – | – | – | – | – | – |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | आ.प.तासगांव | - | १ | - | - | - | - | - | - | - |
| ३० | स्वा.रा.ति.ग्रा. वै.म.अंबाजोगाई | ३ | - | १ | - | १ | १ | १ | - | ५ |
| ३१ | स्वा.रा.ति.ग्रा. वै.म.रु. अंबाजोगाई | २ | - | १ | - | १ | - | - | - | - |
| ३२ | शा.वै.म. यवतमाळ (तीनही आस्थापनांची एकत्रित माहिती) | ४ (मासै-२ अपंग-१ महिला-१) | ४ (महिला-१ मासै-१) | १ (मासै) | - | १ | १ | - | - | - |
| ३३ | शा.वै.म. कोल्हापूर | ३ (मासै-१ महिला-१ अस्थिव्यंग-१) | १ (महिला) | १ (खेळाडू) | - | - | १ (महिला) | - | - | - |
| ३४ | जि.सा.रु. कोल्हापूर | - | - | १ | - | - | - | - | - | - |
| ३५ | शा.वै.म.लातुर | - | - | १ (महिला) | १ (महिला) | १ (महिला) | - | - | - | १ |
| ३६ | जि.सा.रु.लातुर | - | १ (महिला) | - | - | - | - | - | - | - |
| ३७ | जि.सा.रु. अकोला | ३ | - | १ | - | १ | - | - | - | १ |
| **एकूण** | | **११७** | **३५** | **२३** | **९** | **१४** | **९** | **७** | **७** | **४३** |

*** म - महिला**    **मासै - माजी सैनिक**    **खे - खेळाडू**

*** अव्यंग-अस्थिव्यंग**    **अदृष्टी - अल्पदृष्टी**    **मुब - मुकबधिर**

*** कब - कर्णबधीर**

**टिप - पदांच्या एकुण संख्येमध्ये व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा विचार केला जाईल.**

## परिशिष्ट – ”क”

## MEDICAL FITNESS

A candidate must be medically fit to do the work required for the post which he/she has applied to, in the Application form. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed proforma, as given below on a **Letterhead :**

### CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination of Shri./Smt./Kumari. ..............................................................who is desirous of selection to the **Clerk-cum-Typist** posts in Govt. Medical/Dental Colleges and Hospitals **on the establishement of Directorate of Medical Education and Research, Mumbai.**

He/She has not given any personal history of any disease incapacitating him/her. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to do the work required for ................................................post.

Certified that he/she fulfills the following criteria.

(1) Absence of any incapacitating and /or progressive systemic disease/disorder/condition.
(2) Absence of any disability of upper limb/s.
(3) Absence of any major visual/auditory disability.
(4) Absence of psychosis/neurosis/mental retardation.
(5) Abilities to maintain erect posture.
(6) Reasonable manual dexterity.

Though, following deviations have been revealed, in my opinion, these are not impediments to do work as a........................................................

1..........................................................................................
2..........................................................................................
3..........................................................................................

| | |
|---|---|
| Address of the Registered Medical Practitioner | Signature |
| | Name |
| | Registration No. |
| Date | Seal of Registered Medical Practitioner |

## FORM 3 (A)

(for representing a State School Team in the School National Games/ Tournament/competition organised by the School Game Federation of India)

Directorate of Sports and Youth Services of the State of Maharashtra

Certificate to a Meritorious sportsmen for employment to Group C/D service under the State Government.

Certified that Shri/Smt/Kumari.................................................................

son/wife/Daughter of shri ...........................................................................

Resident of (complete address)..................................................................

a student of (name of the school )..............................................................

represented the State School Team in the game/event of.................................

in the National Games for School held at .....................................................

from to

The position obtained by the individual/team in the above said Competition/Tournament was

This Certificate is being given on the basis of record available in the office of Directorate of Sports and Youth Service of Maharashtra.

Place — Signature

Date — Name

Designation

Note: This Certificate will be valid only when signed personally by the Director/Joint Director of Deputy Director of Sports and youth services. Government of Maharashtra State.

परिशिष्ट 'ब'



## प्रतिज्ञापन

नमुना-" अ "

(नियम ४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कुमारी .................................................................................. ,

श्री. .................................................................................. यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय ............. वर्षे, राहणार ..................................................................................

यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(१) मी .......................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .................. (संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक ........................................................ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...................... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक .............................. नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही)